# महाराष्ट्र शासन

**दुरध्वनी क्र.** ०२२-२२८५२६९६ / २२८७३८४४
**फॅक्स क्र.** ०२२-२२०२५९४६
**ईमेल :** envirtc1@gmail.com .

क्रमांक :- नउद्यो-२०११ /प्र.क.६८/तां.क.१
**पर्यावरण विभाग,**
नवीन प्रशासकीय भवन, १५ वा मजला,
मंत्रालय, मादाम कामा रोड, मुंबई-०३२
दिनांक :- ९ सप्टेंबर, , २०१४.

प्रति,

(१) प्रधान सचिव,
नगर विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई

(२) प्रधान सचिव (उद्योग),
उद्योग, उर्जा व कामगार विभाग,
मंत्रालय, मुंबई.

(३) प्रधान सचिव,
जलसंपदा विभाग,
मंत्रालय, मुंबई.

(४) सदस्य सचिव,
महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ,
सायन (पूर्व), मुंबई.

विषय :- नदी खोऱ्यांच्या क्षेत्रामध्ये उदयोगधंदे स्थापन करण्याबाबत धोरण पुर्नविलोकन समितीच्या बैठकीचे इतिवृत्त ....

महोदय,

नदी खोऱ्यांच्या क्षेत्रामध्ये उद्योगंधदे स्थापन करण्याबाबतच्या धोरण पुर्नविलोकन समितीच्या दिनांक ४ सप्टेंबर, २०१४ रोजी दुपारी ३.०० वाजता अपर मुख्य सचिव (पर्यावरण) यांच्या अध्यक्षतेखाली त्यांच्या मंत्रालयीन दालनामध्ये झालेल्या बैठकीचे इतिवृत्त सोबत जोडून पाठवित आहे.

आपला,

(द. सु. भालेराव)
शास्त्रज्ञ श्रेणी-२, पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन.

प्रत,

अपर मुख्य सचिव (पर्यावरण) यांचे स्वीय सहायक यांना माहितीसाठी.

१) मे. फुजित्सु कन्सन्टिंग इंडिया प्रा.लि., प्लॉट नं अे-१५ एमआयडीसी टेक्नॉलॉजी, पार्क, तळवडे,पुणे
२) मे. बेसि ड्रग्ज प्रा.लि., गट नं.२००/१, लखमापूर , ता. दिंडोरी, जि. नाशिक
३) मे.लोढा- सहजानंद हाय टेक कन्स्ट्रक्शन्स प्रा. लि.,गांव गहुंजे ता. मावळ, जि.पुणे
४) मे. त्राडको, डेसन प्रा.लि., अ.क्र.९३/९४ मुंबई आग्रा रोड,देवपूर, ता व जि. धुळे
५) मे. रिलायन्स इडस्ट्रीज लि.बी-4 पाताळगंगा, एम आय डी सी, खालापूर, जि. रायगड
६) मे. कल्याण टोल इन्फास्ट्रक्चर गट नं. ५८३/८४,निमगांव, माहुलंगी, ता. शिरूर, जि.पुणे
७) मे. रिया सीईटीपी, धाटाव, रोहा एमआयडीसी, जि. रायगड
८) मे. शिंडलर इडिया प्रा. लि., एमआयडीसी चाकण फेज-२,खेड, जि. पुणे
९) मे. राऊत सिरम्स प्रा. लि., गट नं.११४२, गांव लवाळे,ता. मुळशी, जि. पुणे
१०) मे .सुमा शिल्प लि./ चित्राली प्रॉपर्टीज प्रा. लि.,अ.क्र. १६९/२, औंध, ता.हवेली, जि पुणे
११) मे. गंगापूर डॅम वॉटर स्पोटर्स व बोटींग.,कार्यकारी अभियंता, जलसंपदा विभाग, त्र्यंबक रोड, नाशिक-२

# नदी खोऱ्यांमध्ये उद्योगधंदे स्थापन करण्यासाठीच्या धोरण पुनर्विलोकन समितीच्या दि.४ सप्टेंबर, २०१४ रोजी दुपारी ३.०० वाजता झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.

नदी खोऱ्यांमध्ये उद्योगधंदे स्थापन करण्यासाठीच्या धोरण पुनर्विलोकन समितीची बैठक दि.४ सप्टेंबर, २०१४ रोजी दुपारी ३.०० वाजता अपर मुख्य सचिव, पर्यावरण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली त्यांच्या दालन क्र.२१७ (विस्तार), दुसरा मजला, मंत्रालय, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस उपस्थितांची यादी सोबत जोडली आहे.

बैठकीसमोर एकूण ११ प्रकरणे विचारार्थ ठेवण्यात आली होती. सदर प्रकरणांवर सखोल चर्चा करण्यात येऊन खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले :-

१) **मे.फुजित्सू कन्सल्टींग इंडिया प्रा.लि., प्लॉट नं.ए-१५, एमआयडीसी, टेक्नॉलॉजी पार्क, तळवडे, पुणे.**

प्रकल्प प्रवर्तकांच्यावतीने त्यांच्या वकिलांनी प्रकरणाची वस्तुस्थिती समितीसमोर सादर केली. त्यानुसार सदर उद्योग तळवडे, पुणे येथील एमआयडीसीमध्ये कार्यरत असून महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ / केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या उद्योग वर्गवारीनुसार हा उद्योग नारंगी संवर्गात मोडतो. इंद्रायणी नदीच्या उच्चतम पूर रेषेपासून त्याचे अंतर २०५ मीटर असून इंद्रायणी नदीचा हा पट्टा राज्याच्या नदी धोरणानुसार अ-२ संवर्गात आहे. राज्य नदी धोरणामध्ये एमआयडीसीला देण्यात आलेल्या सवलतीनुसार अ-२ संवर्गात उच्चतम पूर रेषेपासून ५०० मीटर पलिकडे नारंगी उद्योग अनुज्ञेय आहेत आणि या कारणास्तव समितीच्या दि.११.७.२०११ रोजीच्या बैठकीमध्ये झालेल्या निर्णयानुसार या उद्योगास अनुमती नाकारण्यात आली होती. या निर्णयानुसार म.प्र.नि.मंडळाने सदर उद्योगास कन्सेंट टू इस्टाब्लिश आणि कन्सेंट टू ऑपरेट ही संमतीपत्रे नामंजूर केली होती. या निर्णयाविरोधात संबंधित उद्योगाने जलप्रदुषण कायद्यांतर्गत गठीत अपिलीय प्राधिकरणाकडे केलेल्या अर्जावर प्राधिकरणाने धोरण पुनर्विलोकन समितीच्या फेरविचारार्थ प्रकरण सादर करण्याचे निदेश दिले होते. त्यानुसार हे प्रकरण समितीच्या फेरविचारार्थ सादर करण्यात आले आहे.

सादर करण्यात आलेल्या माहितीनुसार भूखंड क्र.ए-१७ व १९ मध्ये ४३६.०६ चौ.मी. इतके बांधकाम असून तेथे आय.टी. उद्योग सन २००४ पासून सुरु असल्याचे नमूद केले आहे. त्यानंतर उद्योगाने भूखंड क्र.ए-१४, २०, २१ व १५ एमआयडीसीकडून प्राप्त करुन त्यावर बांधकाम करुन आय.टी.उद्योग सुरु करण्यासाठी उद्योगास कन्सेंट टू इस्टाब्लिश आणि कन्सेंट टू ऑपरेट मिळण्यासाठी म.प्र.नि.मंडळाकडे अर्ज सादर केले आहेत. तथापि, दि.१३.७.२००९ च्या राज्य नदी धोरणानुसार आय.टी.उद्योग नारंगी संवर्गात असल्यामुळे तसेच एमआयडीसीला असलेल्या

सवलतीनुसारही नारंगी उद्योगाचे अंतर ५०० मीटर पलिकडे अनुज्ञेय असतांना सदर उद्योगाचे इंद्रायणी नदीच्या उच्चतम पूर रेषेपासूनचे अंतर २०५ मीटर असणे आणि म.प्र.नि.मंडळाकडून या उद्योगास पूर्वी कोणतेही संमतीपत्र दिलेले नसणे या बाबी विचारात घेऊन परवानगी नाकारण्यात आली आहे. तसेच सध्याच्या ४०६.०६ चौ.मी.व्यावसायिक बांधकामातून निघाणारे सांडपाणी आणि त्यामध्ये नवीन भूखंडावरील विस्तारीकरणाच्या बांधकामातून निघणारे सांडपाणी यामुळे एकूण सांडपाण्यात वाढ होणार आहे. तथापि या प्रकरणावरील योग्य तो निर्णय आयटी प्रकल्पांबाबत गठीत केलेल्या समितीच्या शिफारशी प्राप्त होऊन त्यावर शासनस्तरावरुन घेतल्या जाणाऱ्या निर्णयाच्या अनुषंगाने घेण्यात येईल.

**२) मे.बेसी ड्रग्ज प्रा.लि., गट नं.२००/१, लखमापूर, ता.दिंडोरी, जि.नाशिक.**

या उद्योगाने (१) व्हिटामिन $B_25$ फॉस्फेट सोडियम I/P, B/F-६२.५ कि.ग्रॅ. प्रतिमहा, (२) फेरिक अमोनियम सायट्रेट ३३७५ कि.ग्रॅ. प्रतिमहा, (३) बेंझी हायड्रामाईन बेस १.५ मेट्रीक टन प्रतिमहा (४) डायफिनाईल मिथेन २ मेट्रीक टन प्रतिमहा (५) सोडीयम ब्रोमाईड १.२५ मेट्रीक टन प्रतिमहा यांच्या उत्पादनासाठी म.प्र.नि.मंडळाकडे उद्योगास कन्सेंट टू इस्टाब्लिश आणि कन्सेंट टू ऑपरेट ही संमतीपत्रे मिळण्यासाठी अर्ज सादर केला होता. या उद्योगाने ८५० लिटर औद्योगिक सांडपाणी आणि घातक घनकचरा निर्माण होत होता असे नमूद केले आहे. तथापि, अर्जदारांनी नमूद केले आहे की, सन १९९४ नंतर काही कारणास्तव उद्योगाने म.प्र.नि.मंडळाकडून कन्सेंट टू ऑपरेट या संमतीपत्राचे नूतनीकरण करुन घेतले नाही. तथापि आता दि.४.६.२०१३ रोजी सदर उद्योगाच्या संचालकांनी नूतनीकरणासाठी अर्ज सादर केलेला आहे. प्रकल्प प्रवर्तकांनी सदर उद्योग १९९४ ते २०१३ पर्यंत चालू होता असे नमूद केले आहे. तथापि, सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार आणि हजार्डस वेस्ट अधिसूचना, १९८९ नुसार या कालावधी दरम्यान ज्या लाल संवर्गातील उद्योगातून घातक घनकचरा निर्माण होतो त्याची विल्हेवाट कशाप्रकारे लावली जाते याचा दरमहा स्थळ पाहणी करुन अहवाल सादर करणे म.प्र.नि.मंडळावर बंधनकारक आहे. मात्र म.प्र.नि.मंडळाकडे वरीलप्रमाणे प्रतिमहा भेट दिल्याचे व त्यानुसार संनियंत्रण अहवाल उपलब्ध नाहीत. यावरुन सदरचा उद्योग बंद असल्याचे स्पष्ट होते. अन्यथा सर्वोच्च न्यायालयाच्या निदेशानुसार हजार्डस वेस्ट निर्माण करणाऱ्या चालू उद्योगांच्या सर्वेक्षण यादीमध्ये या उद्योगाचा समावेश झाला असता. सन १९९४ ते २०१३ पर्यंत घातक घनकचरा व स्पेन्ट ॲसिडची विल्हेवाट कुठे व कशी लावण्यात आली याबाबतचा तपशीलही उपलब्ध नाही.

सदर लाल संवर्गातील अतिप्रदुषणकारी उद्योग कादवा नदीच्या उच्चतम पूर रेषेपासून १३०० मीटर अंतरावर असून राज्य नदी धोरणानुसार कादवा नदी अ-२ संवर्गात आहे. दि.१५.७.२००० आणि दि.१३.७.२००९ च्या राज्य नदी धोरणानुसार अ-२ संवर्गामध्ये २ कि.मी. अंतरा पलिकडे लाल संवर्गातील अतिप्रदुषणकारी उद्योग अनुज्ञेय आहेत. या उद्योगाचे अंतर केवळ १३००

मीटर आहे तसेच १९९४ पासून म.प्र.नि.मंडळाच्या संमतीपत्राची मुदत संपूष्टात आलेली असल्यामुळे आणि यापुर्वी अस्तित्वातील उद्योगाच्या व्याखेबाबत केलेल्या धोरणात्मक खुलाशानुसार हा उद्योग "अस्तित्वातील उद्योग" या व्याखेत बसत नाही आणि त्यास नदी धोरणातील परिच्छेद-६ मधील सवलती लागू ठरत नाहीत. वरील सर्व बाबी लक्षात घेऊन चर्चेअंती या उद्योगास अनुमती नाकारण्याचा निर्णय घेण्यात आला.

**३) मे.सहजानंद हाय टेक कन्स्ट्रक्शन, गहुंजे, ता.मावळ, जि.पुणे.**

या बांधकाम प्रकल्पाच्या ले-आऊटमध्ये प्रकल्पातील सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा (STP) आणि नागरी घनकचरा प्रक्रिया यंत्रणा (OWC) यांचे अंतराबाबत प्राधिकृत अधिकाऱ्याचे विहित प्रमाणपत्र सादर केलेले नाही. तरी प्रकल्प प्रवर्तकांनी या दोन्ही घटकांचे पवना नदीच्या उच्चतम पूर रेषेपासूनचे अंतराबाबत प्राधिकृत अधिकाऱ्याचे विहित प्रमाणपत्र प्राप्त करुन खातरजमा करण्यासाठी व पुढील निर्णयार्थ संचालक (पर्यावरण) यांना सादर करावे. या प्रमाणपत्राची खातरजमा करुन संचालक (पर्यावरण) हे म.प्र.नि.मंडळास पुढील निर्णयासंबंधी कळवतील असे ठरले.

**४) मे.ट्राडको डिसन प्रा.लि., स.न्र.९३/९४, मुंबई आग्रा रोड, देवपूर, जि.धुळे.**

या प्रकल्पास म.प्र.नि.मंडळाच्या दि.१५.१०.२०१३ च्या बैठकीत संमती नाकारल्यामुळे नदी धोरण पुनर्विलोकन समितीकडे प्रकल्प प्रवर्तकांनी अर्ज केला आहे. प्रकल्प प्रवर्तकांनी नमूद केल्यानुसार त्यांच्याकडे म.प्र.नि.मंडळाचे वैध संमतीपत्र असून अस्तित्वातील उद्योगाच्या विस्तारीकरणाची अनुमती मागितली आहे. प्रकल्प प्रवर्तकांनी उद्योगाच्या विस्तारीकरणानंतर होणाऱ्या प्रदुषणाबाबत रसायन तंत्रज्ञान संस्था, माटुंगा यांचे प्रमाणपत्र सादर केले आहे. तथापि, या प्रमाणपत्रानुसार उद्योगातून होणाऱ्या प्रदुषणात वाढ अथवा घट होते हे तपासण्यासाठी म.प्र.नि.मंडळाकडून उद्योगाबाबत अधिकची माहिती मागविलेली असून सद्य:स्थितीत याबाबत निर्णय घेणे शक्य नसल्याचेही कळविले आहे. या अनुषंगाने उद्योग घटकाने (१) म.प्र.नि.मंडळाने मागविलेली माहिती युडीसीटीला पुरवावी व त्यानुसार युडीसीटीने प्रदुषण प्रमाणाबाबत सुधारीत प्रमाणपत्र द्यावे, (२) या उद्योगातील सद्याची प्रदुषण नियंत्रण यंत्रणा विहित मानकांची पूर्तता करते किंवा कसे याबाबतचे प्रमाणपत्र यु.डी.सी.टी.कडून प्राप्त करुन घेऊन संचालक (पर्यावरण) यांना पुढील कार्यवाहीसाठी सादर करावे.

**५) रिलायन्स इंडस्ट्रीज लि., बी-४, पाताळगंगा, खालापूर, जि.रायगड.**

हा उद्योग पाताळगंगा एमआयडीसी येथील २०० एकर क्षेत्रावर १९८८ पासून कार्यरत आहे. या उद्योगात ४८ मेगावॅट क्षमता असलेला कॅप्टीव्ह पॉवर प्रोजेक्ट असून त्यासाठी गॅस लिक्विड इंधनावर आधारीत बॉयलर्स आहेत. उद्योगाने सध्याच्या बॉयलर ऐवजी सीएफबीसी कोल इंधन

बॉयलरचा प्रस्ताव सादर केला असून त्यास नदी धोरण पुनर्विलोकन समितीची मंजूरी देण्याची विनंती केली आहे. सदर बदलानुसार ०.५% सल्फर असलेला कोळसा यासाठी वापरला जाणार असल्याचे नमूद केले आहे. तसेच एनर्जी जनरेटर १७७ कि.वॅट क्षमतेचा राहणार असून स्टॅक हाईट ११० मीटरपर्यंत व इलेक्ट्रो स्टॅटीक प्रेसिपिटर बसविण्यात येणार असल्याने म.प्र.नि.मंडळाच्या विहित मानकांची पूर्तता होणार असल्याचेही नमूद केले आहे. याबाबत बाबासाहेब आंबेडकर टेक्नीकल युनिर्व्हसिटी, लोणीरे, महाड, जि.रायगड यांनी प्रदान केलेले प्रमाणपत्र सादर करण्यात आले आहे.

तथापि, अस्तित्वातील प्रदुषण संनियंत्रण यंत्रणेची क्षमता तपासणे आवश्यक असून त्यासाठी उद्योगाने यु.डी.सी.टी किंवा आयआयटीकडून त्या यंत्रणेचे सर्वेक्षण करुन यंत्रणा विहित मानकानुसार कार्यरत असल्याचे प्रमाणपत्र तसेच प्रस्तावित इंधनाच्या गुणवत्तेमुळे प्रदुषणात वाढ अथवा घट होते याबाबतचे प्रमाणपत्र पुढील कार्यवाहीसाठी संचालक (पर्यावरण) यांना सादर करावे. तसेच या बदलामुळे उद्योगाच्या उत्पादनातही वाढ होते किंवा कसे हेही स्पष्ट करावे, असा निर्णय घेण्यात आला.

**६) मे.कल्याण टोल इन्फ्रास्टक्चर, गट नं.५८३/८४, निमगुण, म्हाळुंगी, ता.शिरुर, जि.पुणे.**

बैठकीस प्रकल्प प्रवर्तक अनुपस्थित होते. तसेच स्टोन मायनिंग व क्रशिंग हे उद्योग लाल संवर्गातील असून सदर उद्योगाचे स्थान राज्य नदी धोरणानुसार अ-२ प्रवर्गातील नदीच्या पट्टयात असल्याने अर्ज फेटाळण्याचा निर्णय घेण्यात आला.

**७) मे.रिया सीइटीपी, रोहा एमआयडीसी इंडस्ट्रीयल एरिया, रोहा.**

मे.रिया सीइटीपी हा रोहा एमआयडीसीमध्ये कार्यरत असून प्रस्तावित विस्तारीकरणात या सीइटीपीची क्षमता १० एमएलडी वरुन २२.०५ एमएलडी पर्यंत वाढविण्याचे नियोजन आहे. याबाबत कुंडलिका नदीच्या उच्चतम पूर रेषेपासून सीइटीपीचे अंतराबाबतचे प्राधिकृत अधिकाऱ्या विहीत प्रमाणपत्र सादर केलेले नाही. तसेच विस्तारीकरणानंतर प्रक्रियाकृत औद्योगिक सांडपाणी सीआरझेड क्षेत्रात पाईप लाईनद्वारे कुंडलिका नदीत सोडण्यात येणार असल्यामुळे सीआरझेड अधिसूचना, २०११ अंतर्गत शिफारस प्राप्त करुन सादर करण्यात यावी. तसेच एनएआयओने निश्चित केल्यानुसार डिस्चार्जच्या ठिकाणाबाबत स्थानिक रहिवाशी आणि मच्छिमार यांच्या काही सुचना वा हरकती असल्यास सादर कराव्यात. अस्तित्वातील सीईटीपीचे मागील ६ महिन्यांचे संनियंत्रण अहवाल सादर करावेत. त्याचबरोबर सध्याच्या सीइटीपीची गुणवत्ताही केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळ / महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांच्या मानकानुसार असल्याचे प्रमाणपत्र सादर करण्यात यावेत व सध्याच्या क्षमतेनुसार मानकांची पूर्तता करण्यासाठी सीईटीपीचे अपग्रेडेशन करणे आवश्यक असल्यास ते करुन सीईटीपीचा डिस्जार्च विहित मानकांप्रमाणे असल्याचे प्रमाणपत्र निरी किंवा आयआयटी या त्रयस्थ संस्थेकडून प्राप्त करुन सादर करावे. रोहा येथे एमआयडीसीमध्ये

आणि नॉन एमआयडीसी क्षेत्रात एकूण किती उद्योग आहेत, त्यापैकी नदी धोरणाच्या परिकक्षेत किती आहेत, किती उद्योगांचे विस्तारीकरण प्रस्तावित आहे आणि एमआयडीसीतील किती भूखंडावर उद्योगांची उभारणी बाकी आहे याबाबतची माहिती एमआयडीसीने सादर करावी.

वरील बाबींची पूर्तता झाल्यानंतर विस्तारीकरणाबाबतच्या प्रस्तावावर योग्य तो निर्णय घेण्यात येईल, असे ठरविण्यात आले.

**८) मे.शिंडलर इंडिया प्रा.लि., एमआयडीसी चाकण, फेज-२, ता.खेड, जि.पुणे**

समितीने दि.१९.४.२०१४ च्या बैठकीत या प्रकरणाबाबत झालेल्या निर्णयाची नोंद घेतली व त्यानुसार सादर केलेल्या अनुपालन अहवालाबाबत चर्चा झाली. मे.शिंडलर इंडिया प्रा.लि. यांच्या प्रतिनिधींनी प्रस्तावाचे सादरीकरण केले. सादरीकरणानुसार प्राधिकृत संस्थेच्या अहवालानुसार भामा नदीच्या उच्चतम पूर रेषेपासून सदर उद्योगाच्या इटीपीचे अंतर १९७८ मीटर आहे.प्रस्तावित उद्योगाद्वारे उद्वाहनासाठी लागणाऱ्या सर्व भागांचे उत्पादन प्रस्तावित आहे. या उद्योग प्रक्रियेतून एकूण ९३ घन मीटर प्रतिदिन सांडपाण्याची निर्मिती होणार आहे. तसेच याच भूखंडावरील उद्योगाच्या प्रस्तावित टप्पा दोनमधून किती सांडपाणी निघणार आहे याचा उल्लेख केलेला नाही. सदर उद्योग हा केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळ / म.प्र.नि.मंडळ यांनी जाहिर केलेल्या उद्योगाच्या वर्गवारीनुसार लाल संवर्गात मोडतो. शासनाच्या दि.१५.७.२००० व सुधारीत दि.१३.७.२००९ च्या नदी धोरणानुसार लाल संवर्गातील उद्योगांसाठी ज्या एमआयडीसी क्षेत्रांमध्ये सामुहिक सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा कार्यरत असून ती विहित केलेल्या मानकांनुसार प्रक्रिया करण्यासाठी सक्षम आहे, सीइटीपीतून निघणारे औद्योगिक सांडपाणी वहनासाठी आणि प्रक्रियेनंतर अंतिम विल्हेवाटीसाठी वहन व्यवस्था अस्तित्वात आहे अशा एमआयडीसी क्षेत्रात विशेष बाब म्हणून नदीच्या उच्चतम पूररेषेपासून ७५० मीटर अंतरा पलिकडे लाल संवर्गातील उद्योग अनुज्ञेय आहेत. तथापि या एमआयडीसीत वरीलप्रमाणे यंत्रणा नसल्याने शासन धोरणानुसार विभागाने न्यायालयात सादर केलेल्या शपथपत्रानुसार ही विशेष सूट लागू होत नाही. प्रधान सचिव (उद्योग) व मु.का.अ., एमआयडीसी यांनी सदर उद्योगाने उद्योगाची उभारणी केली असल्यामुळे व उद्योगातून निघणारे सांडपाणी कमी प्रमाणात असल्याने या उद्योगाचा विचार व्हावा असे मत मांडले. तसेच या एमआयडीसीमध्ये सीईटीपी बसविण्याबाबत इंडस्ट्रीज असोसिएशनचा प्रस्ताव वा तशी मागणी नसल्यामुळे या औद्योगिक वसाहतीत सीईटीपी बसविण्याबाबत निर्णय घेणे सद्य:स्थितीत शक्य नसल्याचे नमूद केले.

नदी धोरणानुसार ना विकास क्षेत्राच्या पलिकडील भागात नदीच्या उच्चतम पूर रेषेपासून उद्योगाच्या ऑपरेशनल एरियापर्यंतचे अंतर मोजण्याची तरतूद आहे. उद्योगाने हे अंतर मोजून उद्योग या विहित अंतराच्या कार्यकक्षेत बसतो किंवा कसे याबाबतचे विहित प्रमाणपत्र सादर करावे, असे ठरले.

९) मे.राऊत सिरम इंडिया प्रा.लि., गट नं.११४२, लवळे, ता.मुळशी, जि.पुणे.

सदर उद्योगात अँटीव्हिनोम तयार करण्यात येत असून या उद्योगाचे पवना नदीच्या उच्चतम पूर रेषेपासूनच्या अंतराबाबतचे प्राधिकृत अधिकाऱ्याचे विहित प्रमाणपत्र सादर केले नसल्याने कन्सेंट टू इस्टाब्लिश /ऑपरेट संमतीपत्र म.प्र.नि.मंडळाकडून नाकारण्यात आले होते. त्यानुसार उद्योगाने ते प्राप्त करुन सदस्य सचिव, म.प्र.नि.मंडळ व संचालक (पर्यावरण) यांना सादर केल्यानंतर पुढील निर्णय घेण्यात यावा असा निर्णय घेण्यात आला.

१०) मे.चित्राली प्रॉपर्टीज प्रा.लि., स.न.१६९/१, औंध, ता.हवेली, जि.पुणे.

या उद्योगामध्ये आयटी/हॉटेल व मॉल हे ३ घटक समाविष्ट असून म.प्र.नि.मंडळाकडून कन्सेंट टू इस्टाब्लिश /ऑपरेट ही संमतीपत्रे न घेताच उद्योग सुरु करण्यात आला असल्याने म.प्र.नि.मंडळाकडून ती नाकारण्यात आले आहेत. तसेच हे नमूद उद्योग मुठा नदीच्या उच्चतम पूर रेषेपासून ४५० मीटर अंतरावर असून राज्य नदी धोरणानुसार अनुज्ञेय नाहीत. करिता त्यांचा अर्ज फेटाळण्याचा निर्णय घेण्यात आला. उद्योगाने याबाबत अपिलीय प्राधिकरणाकडे आपली बाजू मांडावी, असा निर्णय घेण्यात आला.

११) नाशिक येथील गंगापूर धरणाच्या जलाशयात जलसंपदा विभागाकडून वॉटर स्पोर्टस सुविधा सुरु करणेबाबत.

जलसंपदा विभाग, नाशिक यांनी पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी गंगापूर धरणाच्या जलग्रहण क्षेत्र व जलाशयात बोट क्लब, चेंजींग रुम, जेट्टी इत्यादी सुविधा प्रस्तावित केल्या आहेत. यामध्ये टॉयलेट ब्लॉक्स, जेट्टी, बोट क्लब, चेंजींग रुम, एंट्रन्स पॅव्हिलियन प्रस्तावित केले आहे. या घटकांमधून निघणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा प्रस्तावित केलेली आहे. व्यवस्थापकीय संचालक, एमटीडीसी व जलसंपदा विभाग, नाशिक यांनी प्रकल्पाबाबत केलेल्या सादरीकरणानंतर समितीने खालीलप्रमाणे निर्णय घेतला :-

(१) प्रकल्पामध्ये बोट रिपेयर यार्ड प्रस्तावित आहे. सदर बोटींची दुरुस्ती व देखभाल यार्डातून निघणाऱ्या औद्योगिक सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी Effluent Treatment Plant सुध्दा बसविण्यात यावा.

(२) प्रकल्प धरणाच्या जलग्रहण क्षेत्रात असल्याने यामध्ये सायकल ट्रॅक, सायकल पार्किंग व सायकलींगची सुविधा करुन देण्यात यावी .

(३) धरणाचा जलग्रहण क्षेत्रात नियमाप्रमाणे झाडांची लागवड किंवा वनीकरण केले नसल्याचे निदर्शनास आले. त्यानुसार जलग्रहण क्षेत्रातील या प्रकल्पाच्या क्षेत्रात ग्रीन बेल्ट तयार करण्यासाठी कालबध्द कार्यक्रम सादर करावा.

(४) प्रस्तावित एट्रंन्स पॅव्हिलियन, चेंजींग रुमच्या शेडवर सोलार पॅनेल व विंड हायब्रीड युनिट बसवावेत. तसेच प्रकल्पांतर्गत सोलार स्ट्रीट लाईट लावावेत.

(५) प्रकल्पांतर्गत प्रस्तावित ठिकाणी रिसॉर्ट, हॉटेल वा हॉटेल तत्सम बाबी अनुज्ञेय नाहीत.

(६) प्रकल्प क्षेत्रात थर्माकोल तसेच प्लॅस्टिक ग्लास, कप, प्लेटस्, बॅग, बाटली नेण्यास मज्जाव करुन त्याच्या संकलनासाठी सुविधा प्रवेशद्वारावरच करण्यात यावी.

(७) प्रकल्पांतर्गत उपरोक्त अटींचे अनुपालन होण्यासाठी जबाबदार अधिकाऱ्याचे नांव व फोन नंबर जाहिर करुन तसा फलक लोकांच्या माहितीसाठी प्रकल्पाच्या ठिकाणी लावण्यात यावा. हा अधिकारी नियमांच्या उल्लंघनाबाबत सर्वस्वी जबाबदार राहील.

(८) प्रस्तावित प्रकल्पामुळे धरणातील पिण्याच्या पाण्याचे प्रदुषण होऊ नये यासाठीच्या उपाययोजना निश्चित करुन खातरजमा होईपर्यंत या प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात फक्त ४ पॅडल बोट, २ बनाना बोट, ३ मोटर ऑपरेटर बोट, २ रेस्क्यू बोट इत्यादींच्या वापरासाठी परवानगी देण्यात येत आहे. इतर डिझेल आणि पेट्रोलवर चालणाऱ्या बोटींना परवानगीबाबतचा निर्णय याबाबत मानके व व्यवस्थापन पध्दती ठरविण्यासाठी गठीत करावयाच्या समितीने सादर केलेल्या अहवालानंतर देण्यात येईल. या समितीचे गठन व कार्यकक्षा याबाबतचा प्रस्ताव म.प्र.नि.मंडळाने शासनास सादर करावा. या समितीने या प्रकल्पास घालून दिलेल्या अटींचे प्रत्यक्ष अनुपालन होते किंवा कसे, तसेच प्रकल्पांतर्गत हाऊस किपींग, जलप्रदुषण संनियंत्रण यंत्रणा, इत्यादी अटींच्या अंमलबजावणीबाबत अहवालात समावेश करुन त्याबाबत शिफारशी करणेसुध्दा अपेक्षित असेल.

**धोरणात्मक निर्णय :-**

समितीने आयटी उद्योग ज्यामध्ये फक्त सॉफ्टवेअर निर्मिती होते असा आयटी उद्योग म.प्र.नि.मंडळाच्या उद्योगांच्या वर्गवारीनुसार हिरव्या, नारंगी किंवा लाल यापैकी नेमक्या कोणत्या संवर्गात येतो, तसेच या उद्योगांमधून निघणाऱ्या सांडपाणी आणि औद्योगिक घनकचरा इत्यादीमुळे नदीचे प्रदुषण रोखण्यासाठी या उद्योगांचे एमआयडीसी क्षेत्रात नदीच्या उच्चतम पूर रेषेपासून उद्योगाच्या वर्गवारीनुसार किती अंतर असावे प्रदुषण संनियंत्रण यंत्रणा व तत्रज्ञानामध्ये झालेल्या सुधारणा लक्षात घेऊन एमआयडीसी क्षेत्रात नदी धोरणाने बाधीत अस्तित्वातील उद्योग व भविष्यात येणारे उद्योग यांना जर Zero Discharge ही संकल्पना राबविली तर अशा उद्योगांना द्यावयाच्या अनुमती तसेच नदी धोरणामध्ये काही सुधारणा करणे शक्य आहे काय किंवा कसे, तसेच या उद्योगांसाठी काही स्वतंत्र मार्गदर्शक तत्वे असावीत किंवा कसे व आवश्यकता असल्यास त्यांचे स्वरुप काय असावे, इत्यादीबाबत पुनर्विलोकन समितीस शिफारस करण्यासाठी उच्चस्तरीय तज्ञ गटाची स्थापना करण्याचे ठरले. यामध्ये आयआयटी, निरी, नदी परिस्थीतीकीमधील तज्ञ, सदस्य सचिव, म.प्र.नि.मंडळ, प्रतिनिधी, पर्यावरण विभाग एमआरआरएचा प्रतिनिधी इत्यादींचा समावेश असावा असे ठरले. या समिती गठनाचे प्रारुप व तिच्या कार्य कक्षेचा प्रस्ताव म.प्र.नि.मंडळाने शासनास सादर करावा असे ठरले.

---